## पक्षांतरामागचा तर्क

*पक्षांतरामुळे व्यक्तिगत हितसंबंधांचा लाभ होत असला, तरी त्यामुळे लोकशाही जाणीवेचं नैतिक महत्त्व कमी होतं.*

काँग्रेस व (सेक्युलर) जनता दल यांच्या १५ आमदारांनी विधानसभा सदस्यत्वाचा राजीनामा दिल्यामुळे कर्नाटकातील आघाडी सरकारसमोर राजकीय पेचप्रसंग निर्माण झाला आहे. राज्यातील आघाडी सरकार खाली खेचून सत्ता काबीज करण्याच्या उद्देशाने भारतीय जनता पक्षानेच (भाजप) हे सर्व घडवल्याचा आरोप मोठ्या च्याणावर होतो आहे. परंतु, अलीकडच्या काळातील राजकीय घडामोडींच्या संदर्भात विचार केला, तर कर्नाटकातील सध्याचा घटनाक्रम हा लोकशाहीसमोरच्या एका अधिक गंभीर नैतिक पेचप्रसंगाचं केवळ एक लक्षण ठरतो.

भाजपप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीचं सरकार केंद्रात परत आल्यानंतर सत्ता संघटित व केंद्रित करण्याचा त्यांचा एककल्ली उत्साह पुन्हा उफाळून आला आहे. राज्यांच्या पातळीवर आणि राज्यसभेच्या खासदारांमध्येही पक्षांतरं घडवून आणण्याचे प्रयत्न भाजपकडून सुरू आहेत. बहुमताचं उत्पादन करण्याच्या या प्रयत्नामध्ये सत्ताधारी पक्ष लोकांच्या निवडणुकीय निर्णयाधिकाराला छेद देतो आहे. हे काही काटेकोरपणे नवीन घटित नाही, असा युक्तिवाद कोणी करू शकेल, आणि अर्थातच अशा प्रकारांचा ठपका केवळ भाजपवरच ठेवता येतो असंही नाही. परंतु, प्रभावाच्या पातळीवर अशा पक्षांतरांचा प्रत्यक्षाप्रत्यक्ष फायदा सत्ताधारी पक्षाला होणार आहे, राज्यसभेत पूर्ण बहुमत मिळवण्याचं उद्दिष्ट साध्य व्हायला या घडामोडींची मदत होईल, आणि कोणत्याही छाननीच्या 'अडथळ्या'विना व विरोधाविना कायदानिर्मितीचा कार्यक्रम सत्ताधाऱ्यांना पुढे रेटता येईल. अधिक सखोल पातळीवर, विरोधकांचं अस्तित्त्व पुसलेल्या राज्यव्यवस्थेचं व्यापक उद्दिष्टही त्यांना या मार्गाने साधता येईल. विरोधी पक्षांच्या सदस्यांना शरण यायला (आणि अखेरीस पक्षांतर करायला) भाग पाडण्याकरिता सत्तेच्या विविध यंत्रणा कशा वापरायच्या, या तंत्रावर सत्ताधारी पक्षाने हुकूमत मिळवली आहे. परंतु, विरोधी शक्तींना या प्रयत्नांचा प्रतिकार करणं का शक्य होत नाही आणि ते या पेचामध्ये इतक्या सहज कसे अडकतात? सत्ताधारी पक्षावर विरोधकांकडून होत असलेली टीका लोकांमध्ये जोर का पकडत नाही? हे प्रश्न इथे उपस्थित करायला हवेत.

लोकनियुक्त प्रतिनिधी ज्या सहजतेने पक्ष बदलतात, त्यावरून विचारसरणीहीन व तात्त्विक कल नसलेलं राजकारणाचं स्वरूप समोर येतं. सत्ता काबीज करून पैसा कमावणं आणि मिळालेल्या पैशातून सत्ता काबीज करणं, हा परस्परपूरक तर्क निवडणुकीच्या राजकारणातील मुख्य प्रवाहामध्ये दीर्घ काळ रुजलेला आहे. (काही लक्षणीय अपवाद वगळता) विरोधकांमधील मोठ्या पक्षांनीही या तर्करचनेच्या बांधकामाला हातभार लावलेला आहे. अशा प्रकारचे मार्ग सुरू राहाण्यात त्यांचेही छुपे हितसंबंध आहेत. मग त्यातून विरोधकांच्याच अस्तित्त्वाला धोका निर्माण झाला, तरीही हे मार्ग टिकवण्यात त्यांना रस असल्याचं दिसतं. मुळातच या राजकारणात राजकीय संघटना उरल्या नसून हितसंबंधांची जाळी तेवढी तयार झाली आहेत. अशा वेळी भाजपसारख्या ठोस विचारसरणीय कार्यक्रम

असलेल्या (हा कार्यक्रम घटनात्यक लोकशाहीला कितीही बाधक आहे, हा भाग वेगळा) पक्षाला विरोधी पक्षांचे सदस्य स्वतःकडे खेचणं किंवा अखंड पक्षांनाच गिळंकृत करणं खूपच सहज होतं. सत्तेशी जवळीक ठेवल्याशिवाय राजकारण करणं त्यांना जमत नाही, म्हणजेच अस्सल विरोधकाचं राजकारण करण्याची शक्ती ते गमावून बसले आहेत.

सामर्थ्य व विश्वसनीयता यांच्या अभावामुळे लोकांमध्येही व्यापक स्तरावर निराशा व दुरावलेपणाची भावना आली आहे. घोडेबाजारामुळे लोकांच्यात मताधिकाराचा अनादर होतो, पण त्याबाबत कोणी आक्षेप घेताना दिसत नाही. विशिष्ट राजकीय पक्षाचं प्रतिनिधित्व करत असलेल्या उमेदवारांना निवडणुकीत विजयी करून सत्तेमध्ये पाठवलं जातं, आणि मग खासदार वा आमदार झाल्यावर ते आपल्या आधीच्या विरोधी पक्षामध्ये जाऊन बसतात, अशा वेळी पक्षांतर केलेल्यांना लोकांनी उत्तरदायी ठरवायला हवं. कर्नाटकात झालं त्याच्याणे, निवडून आल्यानंतर एका वर्षाच्या आत राजीनामा दिला तर तो सार्वजनिक कर्तव्यच्युतीचा प्रकार मानायला हवा. आदर्श स्थितीत, किमान अशा उमेदवारांच्या मतदारसंघात तरी लोकांनी निदर्शनं वा आंदोलनं करायला हवीत, जेणेकरून संबंधित प्रतिनिधींवर लोकशाही दबाव येईल. परंतु, अशा काही कृती सार्वजनिकरित्या होताना दिसत नाहीत. किंबहुना, पक्षांतर केलेले प्रतिनिधी पुन्हा निवडून आल्याच्या अनेक घटना पाहायला मिळतात. सार्वजनिक मतभिन्नता, विवेकी संताप किंवा भयंकराची जाणीव, यांचा मतदारांमध्ये इतका अभाव का आहे?

एका बाजूला, या मुद्द्यावर लोकांमध्ये जागृती घडवणं विरोधकांना उपरोल्लेखित कारणांमुळे शक्य झालेलं नाही. दुसऱ्या बाजूला, अशा गैरलोकशाही पद्धतींचा व लबाडीचा वापर करणं म्हणजे 'चाणक्यनीती' आहे, 'मास्टर-स्ट्रोक' आहे, राजकीय चातुर्य आहे, इत्यादी गौरवपर उल्लेख प्रसारमाध्यमं व भाष्यकार, विशेषतः गेल्या पाच वर्षांमध्ये, सातत्याने करत आले आहेत. त्यामुळे या मार्गांना वैधता मिळत जाते. हे सगळं असलं, तरी या सर्व घडामोडींविरोधात संतप्त होऊन लोक उत्स्फूर्तपणे निदर्शनं का करत नाहीत? मतदानाच्या कृतीलाच छेद देणाऱ्या या पद्धतींविषयी मतदार मौन का धारण करतात? मतदान परिपाठासारखं नसलं, तरी कणखर लोकशाही संस्कृतीला बळकट करण्यासाठीची नैतिक ताकद या कृतीमध्ये आहे. मग, पक्षांतरामुळे आपली नैतिक ताकदच निरर्थक वा अपरिणामकारक ठरते, हे मतदारांच्या लक्षात येत नाही का?

व्यापक प्रश्नांवर असं मौन धारण केल्यामुळे नागरिकांची राजकीय सक्रियता केवळ मतदानापुरतीच मर्यादित राहाते. वर उल्लेख केल्याच्याणे पक्षांच्या राजकीय हितसंबंधांचा केवळ साधनभूत वापर झाल्यामुळे मतदारांचं न-राजकीयीकरण घडतं आहे. खुद्द मतदारांनीही केवळ साधनमात्र राजकारणाचा तर्क आत्यसात केला आहे का? 'लोक'प्रतिनिधी लोकशाहीबाबत कोणतंही उत्तरदायित्व न बाळगता कोणत्याही सत्ताधारी पक्षामध्ये प्रवेश करत असतील, तर हा प्रश्न अतिशय वैध ठरतो. मतदारांमधील उत्तरदायित्वाचा असा अभाव अखेरीस सत्ताधारी पक्षाला पूरक ठरतो आणि हा पक्ष कोणत्याही प्रतिकाराविना स्वतःचा विशिष्ट कार्यक्रम अंमलात आणू शकतो. त्यामुळे लोकांनी स्वतःची लोकशाही जाणीव सक्रिय करणं आणि अस्सल विरोधकांचं राजकारण करण्यासाठी विरोधी पक्षांना भाग पाडणं, हे सध्याचं आव्हान आहे. ●


**परिवर्तनाचा वाटसरू नांदेडमध्ये**

मीडिया ॲडस्

द्वारा राहूल वाघमारे, विष्णू कॉम्प्लेक्स,
हॉटेल ताज पाटील समोर, नांदेड
भ्र. ९८६००८३१३४

# अर्थसंकल्पातील संकल्पना आणि आदर्श

अनेक आघाडीच्या अर्थशास्त्रज्ञांनी व भाष्यकारांनी २०१९च्या राष्ट्रीय अर्थसंकल्पाचं चिकित्सक विश्लेषण केलं आहे. अर्थसंकल्पाचा कल उघडच व्यवहार्यतेकडे आहे. एकमेकांच्या प्रतिस्पर्धी हितसंबंधांना सामावून घेण्याचा जुनाच पायंडा या अर्थसंकल्पाने स्वीकारलेला दिसतो. अर्थात, यासोबत अनेक अंतर्विरोधही चिकटून येतात. आपण गरीबस्नेही सुधारणांवर लक्ष केंद्रित करत असल्याचा दावा केंद्र सरकार तावातावाने करतं, पण अंमलबजावणीच्या स्तरावर (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व मध्यम वर्ग अशा) विशिष्ट सामाजिक गटांचं लांगुलचालन करण्याच्या हिशेबाने अर्थसंकल्पातील तरतूद झाल्याचं दिसतं. गरीब वर्ग ही काही राजकीयदृष्ट्या परिणामकारक कोटी (कॅटेगरी) नाही, त्यामुळे त्याला ठोस विशिष्टतांमध्ये विभागण्याची गरज भासते, असंही सरकारने मान्य केलं. एका बाजूला, अतिश्रीमंतांवरील- उदाहरणार्थ, दोन कोटी रुपये उत्पन्न असणाऱ्यांवरील- कर वाढवण्याची तरतूद अर्थसंकल्पात आहे. त्यातून अर्थव्यवस्थेच्या वाढीला पाठबळ मिळेल, असं सांगण्यात आलं. पण दुसऱ्या बाजूला, संसाधनांच्या गुंतवणुकीसाठी कॉर्पोरेट क्षेत्राची खुशामतही अर्थसंकल्पात करण्यात आली आहे.

संसदेत अनिश्चित बहुमत मिळालेल्या सत्ताधारी पक्षाकडून अर्थसंकल्पात विविध प्रस्ताव आणि योजना जाहीर केल्या जातात, असं काही जण म्हणतात, परंतु आत्ताच्या प्रचंड बहुमतातील सरकारनेही तोच पायंडा पाळावा हे काहीसं कुतूहलजनक आहे. डळमळीत बहुमत मिळालेल्या पक्षांना सार्वजनिक खर्चात वाढ करण्याच्या राजकीय व सामाजिक मागण्यांचा दबाव सहन करणं अनेकदा भाग पडतं. त्या अर्थी, अर्थसंकल्प मांडण्याची प्रक्रिया आपोआपच सामाजिकदृष्ट्या प्रगतिशील असल्याचं चित्र निर्माण होतं. परंतु, संपूर्ण बहुमतातील पक्षही परिवर्तनकारी अर्थसंकल्प सादर करून पूर्ण जबाबदारीनिशी स्पर्धक संधींचा अवकाश निर्माण करतीलच असं काही नाही. आपला निवडणुकीतील पाठिंबा- किमान काही समाजगटांचा पाठिंबा टिकवून ठेवण्याची चिंता अशा पक्षालाही सतावत असते, त्यामुळे ही अपरिहार्यता निर्माण होत असावी. त्याचच्याणे गुंतवणूक व भांडवली संचय यांना आकर्षित करण्यासाठी राजकीय स्थैर्य गरजेचं असतं, आणि अशा स्थैर्याबद्दल खाजगी घटकांना आश्वस्त करण्याचीही गरज सत्ताधाऱ्यांना भागवावी लागते. उदारमतवादी आदर्श दृष्टीमधील हा व्यवहार्य विचार आहे. हा विचार अंमलात आणण्यासाठी विस्तृत स्पर्धक अवकाशांमध्ये सक्षम संधी उपलब्ध असण्याची गरज असते. अशा स्पर्धेतून समतेचे स्तर निश्चितपणे निर्माण होतात, पण कालांतराने त्यातून गटांतर्गत व आंतरगट असमता उद्भवायला लागतात. ही असमता नियंत्रित करायची असेल तर असे अवकाश स्पर्धात्यक राहाण्यासाठी आवश्यक परिस्थिती सातत्याने निर्माण करावी लागते आणि तिचा सामाजिक पाया विस्तारावा लागतो. सक्षम संधींचे अधिक स्पर्धात्यक अवकाश तयार केले, तर लोकांना खालावलेल्या अवस्थेतून चांगल्या वा सुधारलेल्या अवस्थेपर्यंत प्रवास करता येतो, परंतु यासाठी मुळात सरकारमध्ये परिवर्तनकारी इच्छाशक्ती असावी लागते. भारतीय अर्थव्यवस्थेला असे अवकाश तयार करता आलेले नाहीत. देशातील ९३ टक्के रोजगार केवळ अनौपचारिक क्षेत्रात उपलब्ध आहे, या वस्तुस्थितीवरून हे स्पष्टच होतं. स्पर्धात्यक अवकाश तयार करण्यात सरकार व बाजारपेठ अपयशी ठरल्यामुळे नागरी सेवा, व्यावसायिक अभ्यासक्रम आणि सरकारी क्षेत्रातील उरल्यासुरल्या रोजगाराच्या संधी यांवरच सर्व इच्छा-आकांक्षांचा दबाव येतो. या

अवकाशांमध्ये शिरकाव करण्याची संधी व विशेषाधिकार अर्थातच खूप मोजक्या लोकांना मिळतो. आरक्षणाच्या मागण्या अलीकडच्या काळात वेगाने वाढू लागल्या आहेत, त्यातून स्पर्धात्यक अवकाशाच्या या आदर्शातील त्रुटी समोर येतात.

बाजारपेठेच्या मूळ तर्कदृष्टीमधूनच लोकांच्या जीवनात विविध पातळ्यांवर विषमता निर्माण होते, हे निःसंशयपणे खरं आहे. परंतु, असमान रचना व प्रक्रियांच्या प्रस्थापित चौकटीमुळे सक्षम सरकारलाही स्वतःच्या बळावर विषमता कमी करणं अवघड जातं. अशा परिस्थितीतही, स्वतः निर्माण न केलेल्या आणि बाजारपेठेच्या कार्यपद्धतीमुळे निर्माण झालेल्या विषमतांचं निर्मूलन करण्याचा प्रयत्न सरकारला करावा लागतो. परंतु, बाजारपेठेने निर्माण केलेल्या विषमता कशा मिटवायच्या, हा प्रश्न यातून निर्माण होतो. राखीव जागांचं च्याण वाढवणं, हा यावरचा एक उपाय सुचवला जातो.

पीक वाया गेल्यास अंशदान म्हणून शेतकऱ्यांना पीकविमा योजनेखाली आणणं, यासारखे उपाय योजले, तर त्यातून शेवटी खाजगी विमा कंपन्यांचाच लाभ होणार आहे. अशा विम्याने शेतकऱ्यांना काही दिलासा कधीही मिळालेला नाही. अंशदान हे काही विषमतेला पर्याय ठरू शकत नाही. किंबहुना, अशा उपायांमुळे लोकांना केवळ अल्पकाळासाठी संकटातून मुक्त झाल्यासारखं वाटतं.

बाजारपेठेने निर्माण केलेल्या मूलभूत विषमतांचा प्रश्न हाताळणं सरकारला भाग असेल, अशा वेळी रचनात्यक दोष दूर करण्याऐवजी परिणामांपुरती नुकसानभरपाई देणं सरकारला साधनदृष्ट्या तार्किक वाटतं. पीडितांना किंवा भरपाई मिळणाऱ्यांना मूल्य रूपात वापरण्यासाठी सरकारला नुकसानभरपाईचा मार्ग रास्त वाटतो. परंतु, खरं तर नुकसानभरपाईची मागणी ज्या परिस्थितीमुळे निर्माण होते, ती परिस्थिती बदलण्यावर सरकारने लक्ष केंद्रित करायला हवं. उदाहरणार्थ, शेतकऱ्यांसमोरच्या संकटकारक परिस्थितीवर सरकारने गांभीर्याने अनेक प्रामाणिक उपाय करण्याची गरज आहे. मुळात नुकसानभरपाईच्या मागणीला कारणीभूत ठरलेली परिस्थिती हाताळण्यात सरकार अपयशी ठरतं, त्यातून आपोआपच नुकसानभरपाई देणं भाग पडतं.

स्पर्धात्यक संधींचे अधिक आकर्षक अवकाश तयार करण्याची गरज भागवणं उदारमतवादी आदर्शासाठी आवश्यक असतं, परंतु अर्थसंकल्प मात्र इतर बाबींसोबतच नुकसानभरपाईच्या उदारवादी (लिबर्टेरियन) संकल्पनाचा वापर करून या आदर्शापासून अंतर राखून चालताना दिसतो.

●

---

## किमान वेतनाचा उपहास

*किमान वेतनाची सध्याची राष्ट्रीय पातळी मूळ उद्देशालाच हरताळ फासणारी आहे.*

कामगार मंत्र्यांनी अलीकडेच १७८ रुपये ही किमान वेतनाची राष्ट्रीय पातळी जाहीर केली. किमान वेतन निश्चित करण्यासाठी आखून देण्यात आलेल्या निकषांची उपेक्षा करून आणि अधिकृत प्रक्रिया टाळून हा आकडा निश्चित करण्यात आला आहे, त्यामुळे किमान वेतनाच्या व्यवस्थेमागच्या मूळ उद्देशाचाच पराभव होतो. जून २०१७मध्ये या संदर्भात शेवटची सुधारणा करण्यात आली होती, तेव्हा प्रति दिवसाचं किमान वेतन १७६ रुपये निर्धारित करण्यात आलं. २०१५ साली हाच आकडा प्रति दिवस १६० रुपये होतं. औद्योगिक कामगारांच्या ग्राहक किंमत निर्देशांकात झालेल्या वाढीच्या आधारावर या वेतनात १० टक्क्यांची वाढ करून २०१७ सालचा आकडा निश्चित झाला. आता, गेल्या दोन वर्षांमधील चलनवाढीचा दर लक्षातही न

घेता ठरवण्यात आलेलं किमान वेतन वास्तवामध्ये उतरत्या दिशेने आलेलं आहे. मग किमान वेतन निश्चित करण्यामागचा उद्देश काय?

किमान वेतनप्रणाली व सामूहिक सौदेबाजीच्या व्यवस्था या श्रम बाजारपेठेतील संस्था आहेत. वेतनाची पातळी व वाटप यांच्यावरही त्या प्रभाव टाकत असतात. कामगारांना गरिबीवर मात करण्यासाठी सक्षम बनवावं, आणि कामगार बाजारपेठेतील व उत्पन्नातील विषमता कमी करावी, या सर्वसाधारण उद्देशाने कामगार धोरणाचा भाग म्हणून राष्ट्रीय किमान वेतन निश्चित केलं जातं. त्यामुळे, कामगारांच्या व त्यांच्या कुटुंबांच्या गरजा भागतील अशा पातळीला किमान वेतन ठरवलं जातं, आणि चलनवाढीचा दरही त्यासाठी विचारात घेतला जातो. परंतु, किमान वेतनप्रणालीपेक्षा सामूहिक सौदेबाजी वेगळी असते. विशेषतः औपचारिक क्षेत्रामध्ये सौदेबाजीचा वापर करून विद्यमान पातळीहून जास्त वेतन निश्चित करता येतं. ताज्या 'आर्थिक सर्वेक्षण' अहवालानुसार, वेतन कमावणाऱ्या अगदी तळातील असुरक्षित घटकांवर लक्ष केंद्रित करणारं परिणामकारक किमान वेतन धोरण संकलित मागणीला चालना देण्यासाठी मदतीचं ठरू शकतं, मध्यमवर्गाची उभारणी करून त्याला बळकट बनवू शकतं, आणि शाश्वत व समावेशक वृद्धीची प्रक्रिया त्यातून निर्माण होऊ शकते

परंतु, चलनवाढीनुसार काहीही बदल न करता किमान वेतन १७८ रुपयांच्या पातळीला निश्चित करणं, हे वास्तवामध्ये कामगारांच्या क्रयशक्तीला क्षीण बनवणारं आहे. कामगार परिषदांच्या विविध सत्रांमधील शिफारसी आणि १९९२ साली सर्वोच्च न्यायालयाने आखून दिलेली मार्गदर्शक तत्त्वं यांचाही सपशेल भंग या नवीन धोरणाद्वारे झाला आहे. शिवाय, किमान वेतन सल्लागार मंडळाची बैठक न घेता किंवा निर्धारित किमान वेतनासंबंधी या मंडळाकडून मंजुरीही न घेता ही घोषणा करण्यात आली. ही वेतनपातळी वैधानिक नसते आणि शिफारस म्हणून निश्चित केली जाते, परंतु राज्य सरकारांना या पातळीच्या खाली किमान वेतन आणता येत नाही. तर, अनियमित रोजगारांसाठी सध्याचं किमान वेतन आधारभूत मानलं, तर दर महिन्याला कामाच्या २६ दिवसांमध्ये जेमतेम ४,६२८ रुपये कामगाराच्या हातात पडतील.

वेतनांची व त्यांच्या वाटपाची सर्वसाधारण पातळी, जगण्यासाठी येणारा खर्च, श्रम उत्पादकतेची पातळी आणि आर्थिक वृद्धीचा दर, या काही निर्देशांकांचा वापर करून किमान वेतनासंबंधीची चर्चा केली जाते, शिवाय कामगार कुटुंबाच्या गरजांचाही विचार हे वेतन ठरवताना केला जातो. परंतु, विद्यमान कामगार मंत्र्यांनी जाहीर केलेलं प्रति दिवस १७८ रुपये हे किमान वेतन कोणत्याही च्याणित निर्देशांकाच्या आधारे निश्चित केलेलं नाही, मनमानी पद्धतीने हा निर्णय घेण्यात आलेला आहे. शिवाय, किमान राष्ट्रीय वेतन प्रति दिवस ३७५-४४७ रुपये (मासिक ९,७५० रुपये ते ११,६२२ रुपये) इतकं असावं, या सरकारच्याच तज्ज्ञ समितीने केलेल्या शिफारसीकडेही केंद्र सरकारने दुर्लक्ष केलं आहे. विशेष म्हणजे या समितीनेही किमान कॅलरी ग्रहणाचं च्याण निर्धारित २,७०० इतकं न मानता २४०० इतकं गृहित धरलं होतं आणि २०१२ सालच्या किंमती समीकरणासाठी गृहित धरल्या होत्या. या व्यतिरिक्त, २०१६ साली सातव्या वेतन आयोगाने शिफारस केलेल्या च्याणित रकमेच्या सुमारे एक चतुर्थांश आकडा नव्या किमान वेतनाने निश्चित केला आहे.

देशातील ९३ टक्के श्रमशक्ती असंघटित क्षेत्रात कार्यत आहे, अशा वेळी किमान वेतनाची निर्धारित पातळी फारचा प्रभाव पाडू शकणार नाही, कारण उत्पन्नाविषयीचे सकारात्यक परिणाम साधण्याचं उद्दिष्ट यातून साधलं जाणार नाही, उत्पन्नाची पातळी वाढणार नाही आणि असुरक्षित कामगारांना व त्यांच्या कुटुंबियांना सुरक्षितताही मिळणार नाही. अवाजवी कमी वेतनापासून- विशेषतः अतिशय कमी वेतनावर काम करणाऱ्या असंघटित क्षेत्रांतील - कामगारांचं रक्षणच

होणार नसेल, तर मग किमान वेतन इतक्या खालच्या पातळीला निश्चित करण्यामागचा तार्किक आधार कोणता,? उलट, २९ राज्यांमध्ये व केंद्रशासित प्रदेशांमध्ये किमान वेतनाची पातळी नवीन किमान राष्ट्रीय वेतनापेक्षा जास्त आहे, त्यामुळे आता या राज्यांमधील किमान वेतनात वाढ होण्याची शक्यता या किमान राष्ट्रीय वेतनाने थांबवली आहे.

नव-उदारमतवादामुळे किरकोळ उत्पादनामध्ये व उपजीविकेसाठी केल्या जाणाऱ्या शेतीमध्ये संकट निर्माण झालं. परिणामी, रोजगाराच्या शोधात मोठ्या संख्येने लोक ग्रामीण भागांकडून शहरांकडे स्थलांतर करत आहेत. अशा वेळी किमान राष्ट्रीय वेतन अत्यल्प पातळीला नेण्याचा निर्णय मोठा आघात करून जाईल. अलीकडच्या काळात कामगार कायद्यांमधील सुधारणांच्या नावाखाली कामगारांना आणि किमान वेतनाच्या व्यवस्थांना लक्ष्य करण्यात आलं आहे, त्याच आक्रमकतेचा भाग म्हणून किमान राष्ट्रीय वेतनाच्या घोषणेकडे पाहावं लागेल. गतकाळात यशस्वी संघर्ष करून कामगारांनी मिळवलेले हक्क व त्यांच्या संरक्षणासाठी करण्यात आलेल्या तरतुदी क्षीण होतील, अशी धोरणं सरकार राबवत आहे. कामगारांऐवजी रोजगारदात्यांच्या हितसंबंधांना विशेष वरचढ स्थान देण्यात आलं आहे. आणि, गरिबांचा आस्थेने विचार करणारं किमान वेतन धोरण आपण अंमलात आणणारच नाही याचे स्पष्ट संकेत केंद्र सरकारने आता दिले आहेत. अपारदर्शकरित्या ठरवण्यात आलेल्या किमान राष्ट्रीय वेतनामुळे वेतनविषयक विषमता अधिक तीव्र होईल आणि उत्पन्न, जगण्याची स्थिती व कल्याणकारी आधार यांच्यातील तफावतही वाढत जाईल. ●

---

## वर्तनात बदल की वरवरचा देखावा?

*संधी वाढवण्यासाठी ठोस उपाय योजण्याऐवजी 'वर्तनात बदल' घडवण्याच्या बाता करणं म्हणजे लोकभावना चेतवून स्वतःचा कार्यभाग साधण्याचा प्रकार आहे.*

सामाजिक-आर्थिक आघाडीवर शोचनीय कामगिरी करूनही प्रचंड बहुमताने पुन्हा निवडून आलेल्या सरकारच्या धोरणांना 'मानवी' चेहरा देण्याचा प्रयत्न 'आर्थिक सर्वेक्षण २०१८-१९' या अहवालात जाणीवपूर्वक करण्यात आला आहे का? सर्वसामान्य लोक काही 'आर्थिक माणूस' म्हणून 'तर्कसंगत' कृती करत नसतात, तर रक्तामांसाचा व चुका करणारा 'मानव' म्हणून ते जगत असतात, आणि देशामध्ये सकारात्यक सामाजिक-आर्थिक बदल घडवण्यासाठी आवश्यक निवडी करण्याकरिता या लोकांना प्रोत्साहन द्यावं लागतं, हस्तक्षेप करून त्यांना थोडं 'हलवावं' लागतं (सक्ती किंवा आदेश यांनी हे काम होत नाही). हा विचार काही नवीन नाही. किंबहुना, वर्तन अभ्यासामधील अशा मर्मदृष्टींचा वापर धोरणनिर्मितीमध्ये व्हावा, असा प्रयत्न जगभरातील सरकारं गेला दशकभराहून अधिक काळ करत आली आहेत. लोकांच्या वर्तनामध्ये सकारात्यक बदल व्हावेत यासाठी जागृती निर्माण करून राज्यसंस्थेच्या विविध कार्यक्रमांमध्ये/योजनांमध्ये व धोरणांमध्ये नागरिकांचा सहभाग वाढवणं, हे यातील अंतःस्थ उद्दिष्ट आहे. 'स्वच्छ भारत अभियान' आणि 'बेटी बचाव, बेटी पढाव' यांसारख्या मोहिमांद्वारे अशा सकारात्यक बदलांसाठी जाग आणायचा आपला प्रयत्न असल्याचा दावा विद्यमान सरकार करतं. प्रस्तुत योजनांनी किती अवकाश व्यापला याची आकडेवारी अशा दाव्याला थोडा आधार देणारी असली, तरी लाभार्थींच्या पातळीवर किती परिणाम झाला याचे पुरावे अतिशय वादग्रस्त आहेत.

उदाहरणार्थ, 'राष्ट्रीय ग्रामीण स्वच्छता सर्वेक्षण,

२०१८-१९' या अहवालामध्ये स्वच्छ भारत अभियानाचं मूल्यमापन देण्यात आलं आहे. त्यानुसार, संडास उपलब्ध असलेल्या ९३ टक्के ग्रामीण घरांपैकी ९६.५ टक्के घरांमध्ये या संडासाचा वापर होतो- म्हणजे देशातील ९०.७ टक्के गावं खुल्या शौचापासून मुक्त झाली आहेत. उलट, २०१७-१८ साली देशाच्या महाअभिलेखापालांनी दिलेल्या अहवालात म्हटलं आहे की, घराच्या पातळीवरील संडासची उपलब्धता आणि आर्थिक सहाय्याद्वारे बांधलेल्या संडासांचा वापर, या निकषांवर स्वच्छ भारत अभियानाचं यश मोजणं समर्थनीय ठरणार नाही. खुल्या शौचापासून एखादं गावं मुक्त झालं आहे किंवा नाही, हे ठरवण्यासंबंधी 'राष्ट्रीय ग्रामीण स्वच्छता सर्वेक्षणा'ने वापरलेल्या निकषांवर महाअभिलेखापालांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केलं होतं. स्वच्छ भारत अभियानाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, एखादा भाग 'खुल्या शौचापासून मुक्त' झाला किंवा नाही याचा निर्णय विष्ठा नष्ट करण्याच्या संदर्भातील कामगिरीनुसार घेतला जातो. म्हणजेच उघडपणे विष्ठा न आढळणं आणि घरांमधून व सार्वजनिक/ सामूहिक संस्थांमधून विष्ठा नष्ट करण्यासाठी सुरक्षित तंत्रज्ञानाचे पर्याय वापरले जाणं, यांनुसार हा निर्णय होतो. खुल्यावरील शौचापासून मुक्त झाल्याचा दर्जा मिळण्यासाठी, संडासांचा वापर किती केला जातो हेही तपासावं, असा उघड उल्लेख या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये कुठेही केलेला नाही.

'बेटी बचाव, बेटी पढाव'च्या बाबतीतही असाच गोंधळवणारा पुरावा समोर येतो. उदाहरणार्थ, राजस्थानातील हनुमानगढ जिल्हा 'मुलींच्या शिक्षणाला सक्षम साथ देणारा' असल्याचं सांगत भारतीय जनता पक्षाने (भाजप) या जिल्ह्याचा गौरव केला. परंतु, शिक्षकांचं प्रशिक्षण, शाळेत स्वच्छ संडासांची उपलब्धता, किंवा शाळेकडे जाण्यासाठी सुकर वाहतूक, इत्यादींसारखे सक्षमीकरणाचं वातावरण निर्माण करणारे मूलभूत घटक मात्र फारसे प्रगत झालेले नाहीत. दुसऱ्या बाजूला, विद्यार्थिनींची पटसंख्या २०१६-१७ साली ५६,०३८ होती, ती वाढून २०१८-१९ साली ९५,४६९ इतकी झाली, ही बाब जिल्हा शिक्षण खात्याने वरकरणी अधोरेखित केली असली, तरी याच कालावधीमध्ये शाळा सोडलेल्या मुलींची संख्या उपलब्ध नाही. विशेष म्हणजे २०१४ सालापासून राजस्थानात शाळा सोडणाऱ्यांची संख्या वाढल्याचं दिसून आलेलं आहे. राज्यातील तत्कालीन भाजप सरकारने जवळपास एक पंचमांश सरकारी शाळा इतर शाळांमध्ये विलीन करण्याचा निर्णय घेतला, त्यामुळे हे घडलं. काही ठिकाणी दूर अंतरावरील शाळेत असं विलिनीकरण झालं, त्यामुळे मग विशेषतः मुलींना विविध सामाजिक-सांस्कृतिक कारणांमुळे दूर शाळेत पाठवण्यास पालकांनी नकार दिला. स्वाभाविकपणे शाळेतून गळती झालेल्यांमध्ये विद्यार्थिनींची संख्या जास्त होती.

अशा पुराव्याच्या पार्श्वभूमीवर, 'वर्तनातील बदला'विषयी आर्थिक सर्वेक्षण अहवालात करण्यात आलेला दावा किंवा सरकारने वेळोवेळी केलेले दावे कितपत विश्वसनीय मानावेत, हा प्रश्न निर्माण होतो. खरं तर, उद्घाटनाचे कार्यक्रम, केक कापण्याचे समारंभ (केकवर कार्यक्रमाचे लोगो लावणं), च्याणपत्र वाटप कार्यक्रम, स्पर्धा, बाइक रॅली, अशाच स्वरूपाचे वरवरचे दिखाऊ बदल झालेले आहेत; तळपातळीवर खऱ्या अर्थाने बदल घडवण्यासाठी कोणतेही उपाय योजण्यात आलेले नाहीत. असं असेल तर, सामाजिक-आर्थिक बदलासाठी लोकांच्या वर्तनाला प्रेरणा देणं आणि राजकीय स्वार्थासाठी लोकांच्या वर्तनाचा गैरवापर करणं, यांमध्ये फरक कोणता राहातो? उदाहरणार्थ, मुलींच्या येण्याजाण्यावर रूढ रचनेने लादलेले विविध सामाजिक-सांस्कृतिक निर्बंध कायमच राहाणार असतील, तर 'बेटी बचाव, बेटी पढाव' योजनेखाली सायकल मिळालेल्या विद्यार्थिनीला त्या सायकलचा काय उपयोग होईल? उलट, तिच्या कुटुंबातील पुरुषांनाच सायकलचा उपयोग होईल आणि त्या बदल्यात या पुरुषांच्या

राजकीय (पक्षाच्या) निवडीवर त्याचा प्रभाव पडेल.

भारतासारख्या देशामध्ये व्यक्तीच्या वर्तनविषयक आकृतिबंधावर सामाजिक-सांस्कृतिक नियमांचा मोठा पगडा दिसतो, अशा वेळी आर्थिक सहकार्य/पैशांचं हस्तांतरण (उदाहणार्थ, पश्चिम बंगालमधील कन्याश्री प्रकल्प योजना) करणाऱ्या योजना वर्तनामध्ये कोणताही मूलभूत बदल घडवण्याची शक्यता नाही. उलट, अशा सहाय्यामुळे सार्वजनिक वर्तन आणखीच भ्रष्ट होण्याची शक्यता आहे, कारण सहाय्य मिळवण्यासाठी लाभार्थी मंडळी दृष्टिकोनात बदल झाल्याचा देखावा निर्माण करतात, पण त्यांचं अंगभूत वर्तन मात्र कायम असतं.

संसाधनं, व्याप्ती व कार्यक्षमता यांच्या मर्यादा असलेल्या रचनेमध्ये तथाकथित 'आर्थिक माणूस' व 'मानव' यांच्यात भेद करणं अवघड असतं. अशा परिस्थितीमध्ये स्वतःला टिकाव धरून राहाता यावं यासाठी सामूहिक कल्याणाची हानी करून स्वहित साधण्यालाच महत्त्व मिळतं. या जमिनीवरील वास्तवाचं कोणतंही पद्धतशीर मूल्यमापन सत्ताधारी सरकारने केलेलं नाही आणि/किंवा आर्थिक संधी, लाभ व कार्यक्षमता विस्तारण्यासाठी कोणताही कृतिआराखडा तयार करण्यात आलेला नाही. त्यामुळे धोरणात्यक चौकटीमध्ये व्यवहार्य बदल झाल्याचे दावे करत 'आर्थिक माणसा'कडून (homo economicus) 'मानवा'कडे (homo sapien) लक्ष केंद्रित करण्यात आल्याचं सांगितलं जात असलं, तरी तो केवळ लोकभावना चेतवून स्वतःचा कार्यभाग उरकण्याचा प्रकार आहे. परिभाषा व नामबदलाच्या या क्षुद्र राजकारणाआड स्वतःची निष्क्रियता लपवून ठेवणं सरकारला कुठवर शक्य होईल?

●

## प्रक्षुब्ध न्याय

भारतामध्ये सध्या केंद्र सरकारने आणि राज्य सरकारांनीही राखीव जागांचा विस्तार करण्याचा सपाटा लावला आहे. आरक्षणाच्या लाभार्थींपैकी अनुसूचित जाती (शेड्युल्ड कास्ट : एससी) व अनुसूचित जमाती (शेड्युल्ड ट्राइब : एसटी) या घटकांच्या मूळ यादीमध्ये भर घालून किंवा त्यावर अतिक्रमण करून राखीव जागा अधिक समावेशक करण्याचे सरकारी प्रयत्न सुरू आहेत. या विस्ताराचं समर्थन करताना सरकारांनी आर्थिक मागासपणाचं कारण पुढे केलं आहे. हे कारण पुरेसं नाही, असं विवाद्यरित्या म्हणता येईल. आर्थिक मागासपणाचा निकष स्वीकारला तर आर्थिकदृष्ट्या जास्त मागास असूनही तितक्या च्याणात राखीव जागा न मिळालेले सामाजिक घटक वंचित राहातात. अशा वेळी, शाब्दिक भेद करणारं हे तत्त्व १० टक्के व १३ टक्के जातींपुरतंच का मर्यादित करण्यात आलं, असा प्रश्न इथे उपस्थित करावा लागतो. हे तत्त्व स्वीकारायचं असेल, तर सरकारने सामाजिक अवकाशातील आर्थिकदृष्ट्या सर्वांत मागास सामाजिक गटांपासून त्याची अंमलबजावणी सुरू करायला हवी. या प्रश्नाचं उत्तर बहुतेक नवीन राखीव जागांच्या राजकारणामध्ये सापडण्याची शक्यता आहे. या राजकारणानुसार, सध्या सत्तेत असलेल्या पक्षाच्या निवडणुकीय यशामध्ये अल्पसंख्याकांना महत्त्वाचं स्थान असेलच असं नाही.

याशिवाय, नवीन आरक्षण धोरणामध्ये आणखीही काही त्रुटी आहेत. नव्याने आरक्षणाच्या कक्षेत आलेल्यांसाठी राखीव जागांची तरतूद करणं, हे घटनाकर्त्यांच्या मांडणीतील 'प्रगतिशील' तत्त्वापासून फारकत घेण्यासारखं आहे. अनुसूचित प्रवर्गांमधील पात्र उमेदवारांची नियुक्ती होण्यामध्ये विशेषतः उच्च-जातीयांचा पूर्वग्रह आड येतो, त्यावर उपाय करण्याच्या

उद्देशाने मूळ घटनात्मक चौकटीमध्ये राखीव जागांची व्यवस्था समाविष्ट करण्यात आली. याच कारणामुळे भारताने आरक्षित जागांची व्यवस्था स्वीकारली, आणि अमेरिकेच्याणे केवळ सकारात्मक कृतींपुरती या उपायांची व्याप्ती मर्यादित ठेवली नाही. अंतिम निष्पत्ती साधण्यासाठी किंवा सेवेमध्ये प्रत्यक्षात रुजू होण्यासाठी आवश्यक असलेल्या परिस्थितीची पूर्तता सकारात्मक कृतींद्वारे होते, पण त्या पुढील पाऊल म्हणून राखीव जागा गरजेच्या ठरतात. प्रस्तावित नवीन आरक्षण धोरणामुळे जातीय पूर्वग्रहाचा हा घटक निवळून जाण्याची शक्यता आहे, कारण निवडणारा व निवडीसाठी स्पर्धेत असलेला, असे दोघेही कमी-अधिक च्याणात सारख्याच प्रभुत्वशाली सामाजिक पार्श्वभूमीचे असतील. अशा वेळी निवडकर्ता संबंधित उमेदवारांची भरती करून घेताना अधिक अमूर्त निकष वापरेल, की उच्च-जातींमधील उप-जातींसारखे अधिक पूर्वग्रहाधारित निकष वापरेल, हा प्रश्न इथे महत्त्वाचा ठरणार आहे.

अशा तरतुदी केवळ सरकारी क्षेत्रापुरत्याच मर्यादित आहेत, ही बाब नवीन आरक्षित लाभार्थींच्या आणि असं आरक्षण देऊ करणाऱ्या सरकारच्याही लक्षात येत नाही. बाजारपेठ व खाजगी क्षेत्रं हे वगळणुकीसाठी वापरले जाणारे अडथळे आहेत, हेच या जातींच्या सदस्यांनी अप्रत्यक्षतरित्या मान्य करून टाकलेलं आहे. असं धोरण स्वीकारलं, तर या नवीन आरक्षित समूहांकडून खाजगी क्षेत्राची उलटतपासणी कधीच घेतली जाणार नाही आणि सरकारी नोकऱ्यांवर अवाजवीरित्या अवलंबून राहिल्यासारखे होईल.

परंतु, विशिष्ट जातीय संदर्भात, सैद्धान्तिकदृष्ट्या बोलायचं तर, आरक्षणाच्या विस्ताराचे काही लाभही आहेत. दलितेतर व इतर मागास वर्गांबाहेरच्या उच्च जातीय गटाला सरकारी नोकऱ्यांमध्ये पर्याय उपलब्ध करून देणं, हे यामागचं एक कारण दिसतं. परंतु, आरक्षणाच्या धोरणाला आधार देऊ पाहणारं हे कारण मूळ तर्काच्या पातळीवरच अंतर्गत व बाह्य वगळणुकीला जागा करून देतं. संधी देणाऱ्या रचनांमध्ये स्पर्धेच्या प्रेरणेतून आरक्षणाचं धोरण राबवलं गेलं, तर त्यातून अंतर्गत भेदभाव उद्भवेल. एससी/एसटी आरक्षणाच्या बाबतीतही मर्यादित अवकाशात हे घडलेलं आहे. अशा प्रकारचा भेद राहिला तर संबंधित माणसाला जातजाणीवेपासून अंतर राखण्यासाठी व अखेरीस व्यक्ती बनण्यासाठी प्रोत्साहन मिळेल, आणि ही व्यक्ती जातीच्या नव्हे तर स्वतःच्या क्षमतेवरच अस्तित्त्वात राहील, असा युक्तिवाद जतनवादी करू शकतात. पण राखीव जागांमुळे एक सदस्य दुसऱ्या सदस्याशी आधुनिक आधारानुसार स्पर्धा करणार असेल, तरच त्यातून जातिआधारित सामाजिक नैतिकता उद्ध्वस्त होईल आणि जातजाणीवेतून बाहेर पडण्यासाठी आवश्यक परिस्थिती निर्माण होऊ शकेल. परंतु, हे आपोआप घडणार नाही. आधुनिकतेमुळे उभ्या ठाकणाऱ्या आव्हानांना तोंड देता आलं नाही तर संकटप्रसंगी व्यक्ती जातीय संसाधनांवर विसंबून राहाण्याची शक्यता आहे. याला 'आधुनिकतेचा लहरीपणा' म्हणता येईल. आरक्षणाद्वारे व्यक्तीला यश मिळाल्याने या लहरीपणावर नियंत्रण घालता येईलच असं नाही.

दुसऱ्या पातळीवर, आरक्षणाच्या लाभार्थींना सामायिक सामाजिक ओळख मिळेल, त्यामुळे या संकल्पनांशी जोडलेली कलंकाची जाणीव पुसली जाण्यासाठी न्यायाच्या या विस्तारित स्वरूपाची मदत होण्याची शक्यता आहे. उच्च-जातीयांनी सामाजिक न्याय व दलित या संज्ञा परस्परपर्यायी असल्याच्याणे वापरलेल्या आहेत. नवीन आरक्षण व्यवस्था लागू होण्यापूर्वी आरक्षणविरोधी घटक सामाजिक न्यायाच्या तत्त्वाविरोधात अपमानकारक वक्तव्यं करत, त्यामुळे दलित व सामाजिक न्याय हे जणू काही समानार्थी शब्दप्रयोग बनून गेले होते. नवीन आरक्षण व्यवस्थेचे लाभार्थी आता तरी सामाजिक न्यायाच्या तत्त्वाविषयी समतावादी दृष्टिकोन स्वीकारतील आणि या तत्त्वाचा

वैश्विकदृष्ट्या आदर्शलक्ष्यी ठरणारा अर्थ प्रस्थापित करतील, अशी आशा करायला जागा आहे. परिणामी, सामाजिक न्यायाच्या संकल्पनेला सार्वत्रिक आदर मिळायला सुरुवात होईल. सामाजिक न्यायाच्या तत्त्वाचा तात्कालिक लाभ मिळणाऱ्या दलित व आदिवासी यांसारख्या समाजशास्त्रीय घटकांपुरतीच ही संज्ञा मर्यादित राहाणार नाही. समतावादी वृत्तीमुळे या संज्ञेच्या बाबतीत ज्ञानशास्त्रीय दिलासा मिळेल आणि दुरावलेले सामाजिक संबंध काहीसे सुधारतील, अशी शक्यता आहे. ●

## टाळता येण्याजोगी हानी

*मेंदूज्वरासंबंधी उपाय करताना तत्परतेची जाणीव ठेवण्याची आत्यंतिक गरज आहे.*

बालकाचा मृत्यू ही जीवनातील सर्वांत मोठी शोकांतिका असते, असं म्हटलं जातं. बालकाच्या मृत्यूनंतर पालकांचं जगणं पुन्हा कधीच पूर्ववत होत नाही, हे यामागचं कारण आहे. गेल्या काही महिन्यांमध्ये बिहारमधील मुझफ्फरपूर जिल्ह्यात मेंदूज्वरामुळे १५३ बालकांचा मृत्य झाला आहे, असं अधिकृत आकडेवारी सांगते. या शोकांतिकेचं मोजमाप होऊ शकेल का? प्रसिद्ध झालेल्या बातम्यांनुसार, १९९५ सालापासून हा आजार मुझफ्फरपूर जिल्ह्यावर घोंघावत राहिलेला आहे, आणि २०१० ते २०१४ या काळात जवळपास १,००० बालकांनी यामध्ये जीव गमावला आहे. खरं तर अशी नुसती बातमी फुटल्यानंतर संपूर्ण राष्ट्राने त्वेषाने पुढे येऊन हा आजार नष्ट करण्यासाठी किंवा किमान तातडीने त्याला नियंत्रणात आणण्यासाठी प्रचंड प्रयत्न सुरू करायला हवे होते. उलट, वर्षानुवर्षं प्रसारमाध्यमं व सार्वजनिक अवकाशामध्ये या घटनाक्रमाला एक नियमित रूप येऊन गेलं. शून्यात नजर गेलेले पालक आपल्या बालकांची प्रेतं घेऊन बसलेत, अशी छायाचित्रं मन विषण्ण करतात. दुसऱ्या बाजूला आजाराच्या कारणांविषयी अनुमान बांधणाऱ्या वार्ताही येत राहातात. राजकीय वर्ग व सत्ताधारी- विशेषतः राज्य सरकार विविध स्पष्टीकरणं देत राहातं, विधान करत राहातं, पण आरोग्य क्षेत्रातील ही शोकांतिका संपवण्यासाठी कोणत्याही सातत्यपूर्ण उपायांसंबंधी कोणताही संकेत मिळत नाही. या वर्षीही हे सगळं असंच घडलं.

या जिल्ह्यामध्ये इतकी वर्षं आरोग्यविषयक पाहणीसाठी जाणाऱ्या डॉक्टरांनी व वैद्यकीय संशोधकांनी वारंवार स्पष्ट केलं आहे की, हे मृत्यू रोखणं अवघड नाही. तरीही, परिस्थिती जैसे-थे राहाणं, हे जास्तच सर्द करून टाकणारं आहे. लीची फळ खाल्ल्यामुळे मुलांचा मृत्यू झाल्याचा ठपका ठेवला जात असला, तरी केवळ तीव्र कुपोषणामध्ये असलेल्या बालकांच्याच बाबतीत हे कारण लागू झाल्याचं दिसतं. कुपोषित नसलेल्यांनी हे फळ खाल्लं, तर ती काही आरोग्यविषयक समस्या मानली जात नाही. आजाराची लक्षणं दिसल्यानंतर पहिल्या चार तासांमध्ये ग्लुकोज योग्य च्याणात देणं, हा जीव वाचवण्यासाठी कळीचा घटक असल्याचंही समोर आलं आहे. परंतु, कुपोषणाचं मोठं च्याण आणि प्राथमिक आरोग्य केंद्रांवर ग्लुकोज व प्रशिक्षित डॉक्टरांची अनुपलब्धता, या दोन्ही बाबतीत इतक्या वर्षांमध्ये राज्य सरकारने कोणतीही निकडीची पावलं उचललेली नाहीत. मुझफ्फरपूर जिल्ह्यातील श्रीकृष्ण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात व्हायरॉलॉजीची प्रयोगशाळा नाही किंवा बालरुग्णांसाठी पुरेसे पलंग नाहीत, ही वस्तुस्थिती सरकारी अनास्थेचीच निदर्शक आहे. अशा परिस्थितीमध्ये रुग्णांना पहिल्यांदा जिथे नेलं जातं त्या प्राथमिक आरोग्य केंद्रांची अवस्था काय असेल, याची कल्पनाच केलेली बरी.

या किंवा अशा प्रकारच्या शोकांतिका विविध

राज्यांमध्ये का घडतात, या प्रश्नाला अनेक पैलू आहेत. उत्तर प्रदेशात गोरखपूर जिल्ह्यामध्ये २०१७ साली ७०हून अधिक बालकांचा मृत्यू झाला होता, हे एक उदाहरण या संदर्भात चटकन आठवणारं आहे. त्या वेळी, संसर्गामुळे मृत्यू झाल्याचं कारण राज्य सरकारने दिलं होतं. पण ऑक्सिजन सिलेंडर पुरेशा संख्येने उपलब्ध न झाल्यामुळे बालकं गुदमरून मरण पावल्याच्या बातम्या आल्या होत्या, आणि संबंधित पुरवठादाराचं देणं न भागवल्यामुळे सिलेंडरांची चणचण निर्माण झाली होती. या राज्यामध्ये गोरखपूर जिल्ह्यातच जपानी मेंदूज्वराचा सर्वाधिक आढळ होतो.

विविध राज्यांमध्ये रुग्णालयात दाखल केल्यानंतरही बालकं मोठ्या संख्येने मृत्युमुखी पडतात, त्यामागे काही सामायिक कारणं आढळतात : रुग्णांच्या पोषणाची पातळी, त्यांच्या कुटुंबांची गरिबी, आणि या रुग्णालयांमधील उपलब्ध सुविधांची दुरवस्था, असे या शोकांतिकांमागील कारणीभूत घटक आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये जीवनदायी औषधं, वैद्यकीय उपकरणं आणि डॉक्टर व रुग्णसेविका यांची तातडीची गरज असल्याचं आरोग्यविषयक कार्यकर्त्यांनी वारंवार सांगितलेलं आहे. शिवाय, या रचनेला पूरक पायाभूत सुविधा असतील, आणि वैद्यकीय कर्मचारीवर्गासाठी किमान ठिकठाक राहाण्याजोगी परिस्थिती असेल, तरच या परिस्थितीवर उपाय होऊ शकतो. निधीअभावी आणि खाजगी रुग्णालयांच्या प्रसारामुळे सार्वजनिक आरोग्य व्यवस्था कोलमडत असल्याचे इशारे सातत्याने कित्येक वर्षं दिले जात आहेत. गरीब कुटुंबांमधील कुपोषणावर उपाय करण्यासाठी विशेष व्यूहरचना आखण्याची गरजही वेळोवेळी अधोरेखित करण्यात आलेली आहे. बिहारमधील विशेषतः मुझफ्फरपूर जिल्ह्यामध्ये (पाच वर्षांखालील) खुंटित, खुरटलेली व कमी वजनाची मुले जास्त संख्येने आढळतात, त्यावर उपाय करण्यासाठी राज्य सरकारने काही व्यूहरचना आखणं अत्यावश्यक बनलं आहे.

मुझफ्फरपूरमधील रुग्णालयाला केंद्रीय व राज्य मंत्र्यांनी आणि इतर राजकीय नेत्यांनी भेटी दिल्या तेव्हा रुग्णांच्या कुटुंबियांनी संतप्त प्रतिक्रिया दिल्या, आणि भेटीवर आलेल्या नेत्यांनी परत जावं अशा मागण्या केल्या. बालरुग्णांसाठीच्या पलंगांची संख्या वाढवली जाईल आणि व्हायरॉलॉजी प्रयोगशाळा रुग्णालयात उभी केली जाईल, असं आश्वासन पीडित कुटुंबीयांना देण्यात आलं. इतक्या वर्षांमध्ये हे का करण्यात आलं नाही, हा इथला कळीचा प्रश्न आहे. अधिकारी पदांवरील व्यक्तींनी परिस्थितीकडे दुर्लक्ष केल्यामुळे रुग्णांचे कुटुंबीय संतापले होते, ही अवस्था केवळ मुझफ्फरपूरपुरती मर्यादित नाही.

आरोग्यसेवांच्या तरतुदीचा विचार करता गरीबांना अतिशय दुर्लक्षित परिस्थितीत राहावे लागते आणि त्यातून ते संतप्त होतात, हे उघड आहे. त्यांचा संताप अनेकदा डॉक्टरांविरोधात निघतो हेही खरं आहे, कारण डॉक्टरही या अन्याय्य व्यवस्थेचा भाग असल्याचं मानलं जातं. सार्वजनिक अवकाशामध्ये आणि त्यातही विशेषतः प्रसारमाध्यमांनी या अन्यायाला व संतापाला वाचा फोडायला हवी. डॉक्टरांविरोधातील हिंसा किंवा घटनास्थळाला भेट देणाऱ्या राजकीय नेत्यांविरोधात झालेली निदर्शनं, एवढ्याच घटनांच्या बातम्या देऊन थांबणं योग्य नाही. अगदी एखाद्या बालकाचा मृत्यू थोपवणं शक्य असूनही ते घडत नसेल तर आपल्याला शरम वाटायला हवी आणि त्यावर कृतीसाठी आपण पावलं उचलायलाच हवीत. ●

इकॉनॉमिक अँड पोलिटिकल वीकलीचे संपादकीय लेख अनुवादित करण्यासाठी 'एच. टी. पारेख फाऊंडेशन'चे साहाय्य लाभले आहे. (दि. १३ व २० जुलै या अंकांतून. 'अर्थसंकल्पातील संकल्पना आणि आदर्श' व 'प्रक्षुब्ध न्याय' ही संपादकीये गोपाळ गुरू यांनी लिहिली आहेत.)

**परिवर्तनाचा वाटसरू मुंबईमध्ये**

पीपल्स बुक हाऊस

मेहेर हाऊस, १५, कावसजी पटेल स्ट्रीट, फोर्ट
मुंबई ४११००१ दू. ०२२ २२८७३७६८